# मे. अल हिंद लुब्रिकंट्स, गट नं. ४१२, मौजे उसर, पो. उचाट, ता. वाडा जि. पालघर यांचे प्रस्तावित प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांचे पर्यावरण आघात मूल्यांकन (इ.आय.ए.) अधिसूचना २००६, दि. १४/०९/२००६ च्या तरतुदीनुसार मे. अल हिंद लुब्रिकंट्स, गट नं. ४१२, मौजे उसर, पो. उचाट, ता.वाडा, जि. पालघर यांचेकडून प्रकल्पाच्या प्रस्तावित विस्तारीकरणानंतर सोडियम हायड्रॉक्साईड उत्प्रेरकाच्या उपस्थितीत अखाद्य तेलांसह (रुचि सोया, पतंजली, लिबर्टी तेल) मिथेनॉलच्या सर्वात मोठया प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या ट्रान्स एस्टेरिफिकेशन प्रतिक्रियेद्वारे बायो डिझेल तयार करणे या उत्पादन प्रक्रियेसाठी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ येथे दि. १६.११.२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने सदर उदयोगाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याकरिता मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) यांचेकडे उप प्रादेशिक कार्यालय मप्रनि मंडळ कल्याण 3 यांजकडून प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) मप्रनि, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई-८७/२०२३, पत्र क्र.BO/JD(WPC)/PH/B-231211-FTS-0262, दि. ११.१२.२०२३ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण ३ या कायार्लयास पर्यावरण विषयक जाहीर जनसुनवणी घेण्याचे निर्देश देण्यात आले. सदर प्रकल्पाचे प्रस्तावित विस्तारीकरणाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | **जिल्हा न्याय दंडाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाच्या कमी नाही असे त्यांचा प्रतिनिधी** | **अध्यक्ष** |
| २) | **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण** | **सदस्य** |
| ३) | **उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३** | **संयोजक** |

सदर निर्देशानुसार जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या मान्यतेने दि. २७.१२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. हॉटेल शिवम-इन लॉजिंग अँण्ड बोर्डीग, वाडा-भिवंडी रोड, नऱ्हे फाटा, नऱ्हेगाव, ता.वाडा, जि. पालघर-४२१३१२ येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यात आली. सदर जनसुनावणीची जाहीर सूचना सुनावणीच्या एक महिना आधी दि. २६.११.२०२३ २०२३ रोजी मराठी दै.लोकमत व इंग्रजी दैनिक द फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, शिव (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
३. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हा
४. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
६. उप विभागीय अधिकारी, वाडा, जि. पालघर

कृ.मा.प.

७. प्रादेशिक अधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण
८. तहसिलदार कार्यालय, वाडा, जि. पालघर
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा ता. वाडा, जि.पालघर
१०. महाव्यावस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, पालघर
११. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत, उसर, ता. वाडा जि. पालघर

तसेच वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मुळ उद्देश, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस सदर प्रकल्पाविषयी माहिती, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यांची माहिती सामान्य जनतेस देणे, त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबबत परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना लेखी अथवा तोंडी स्वरुपात अथवा ई-मेलद्वारे कळवाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाबाबत उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण ३ येथे ४ सूचना ई-मेलद्वारे प्राप्त झाल्या होत्या. (प्रत सोबत)

मे. अल हिंद लुब्रिकंट्स या उदयोगाच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांच्या उपस्थितीत दि. २७.१२.२०२३ रोजी दि. १२.५९ मि. सुरु करण्यात आली. सदर सुनावणीस लोकप्रतिनिधी, उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, वृत्तपत्र/ वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील सामान्य नागरीक असे एकूण ५० प्रतिनिधी उपस्थित होते, याबाबतची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच या जनसुनावणीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री. गोविंद मारुती बोडके, अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी व जिल्हा न्याय दंडाधिकारी, पालघर जिल्हा
२. डॉ. राजेंद्र आ. राजपूत, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण
३. डॉ.सीमा उदय दळवी, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३
४. श्री. संजीव रेदासनी, क्षेत्र अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ कल्याण
५. श्री. महेंद्र पट्ठेबहादूर, क्षेत्र अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांच्या परवानगीने जनसुनावणीबाबत प्रस्तावना सादर केली आणि प्रकल्प प्रवर्तकास प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक तांत्रिक बाबींसंदर्भात पॉवरपॉईंटचे सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक यांनी मे. अल हिंद लुब्रिकंट्स यांचे प्रस्तावित प्रकल्पाचे पॉवरपॉईंट (पी.पी.टी.) सादरीकरणासह तपशिलवार माहिती सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. प्रकल्पाच्या सादरीरकरणा नंतर उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्पाबाबत कोणाला काही सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी मांडण्यसासाठी आयोजका तर्फे आवाहन करण्यात आले तसेच जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना दयावयाच्या असतील तर सुनावणी दरम्यान म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी कडे दाखल करण्यास सांगितले.

कृ.मा.प.

त्यानुसार खालीलप्रमाणे उपस्थितांकडून सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करण्यात आले व त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकाने सविस्तर अभिप्राय दिले :-

१) **श्रीमती सानिका संदिप दुबेले,उसर ग्रामपंचायत, ता. वाडा** - सुरुवातीस सगळे सांगतात की, प्रदूषण होणार नाही पण नंतर वायु प्रदूषण झाले, शेतकऱ्यांचे नुकसान झाले अथवा त्यांना त्रास झाला तर तक्रार कोणाकडे करायची व भविष्यात कोणी तरी याची जबाबदारी स्विकारतील काय ?

**श्रीमती सानिका संदिप दुबेले, उसर ग्रामपंचायत, ता. वाडा**- आम्ही ग्रामस्थ वरच्या पातळीवर तक्रार करु शकत नाही म्हणून ग्राम पंचायत कडे तक्रारी देतो, परंतु काहीही कारवाई होत नाही. तसेच तक्रार करु नका असे आमच्यावर दबाव येते आम्ही काय करायचे?

प्रदूषणाबाबत तक्रार म.प्र.नि. मंडळाकडे नमूद करता येईल असे मा. जिल्हाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष यांनी सांगितले. तद्नंतर संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण ३ यांनी तक्रारीचे निवारण कशा प्रकारे केले जाते याबाबत विस्तृत माहिती दिली.
प्रकल्प प्रवर्तकांनी उद्योगाकडून प्रदूषण नियंत्रण करण्याबाबत कोणकोणती खबरदारी घेतली जाईल याबाबत माहिती दिली.

२) **श्री. महेंद्र जनार्दन पाटील, उसरगाव, ता. वाडा, जि. पालघर**- महसुल विभागाचे २०१७ च्या प्रादेशिक योजनेच्या नियमाप्रमाणे गावठाणापासून किती अंतरावर उद्योगांना परवानगी देता येते?

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण ३ यांनी सदर जनसुनावणी फक्त प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक प्रश्न/मुद्यांबाबतअसल्याने कृपया फक्त पर्यावरण विषयक प्रश्न विचारावे असे नमूद केले.

**श्री. महेंद्र जनार्दन पाटील, उसरगाव, ता. वाडा, जि. पालघर**- परंतु या उद्योगाला दिलेली कन्सेंट टू ऑपरेट आहे ते गावठाणच्या काही मिटर अंतरावर असून तसे देता येते काय? गावठाणच्या बाजूला असलेल्या कंपनी रेड श्रेणीत येतात मी याबाबत दोनदा पत्र व्यवहार केलेला आहे. २०१७ च्या प्रादेशिक योजनेनुसार सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेली कन्सेंट टू ऑपरेट देता येते का याची माहिती मिळावी.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण ३ यांनी सांगितले की, याकरीता ग्राम पंचायतीकडून ना-हरकत दाखला देण्यात येतो आणि ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला असल्याशिवाय मप्रनि मंडळ संमतीपत्र प्रदान करत नाही.

**श्री. महेंद्र जनार्दन पाटील, उसरगाव, ता. वाडा, जि. पालघर**- ग्रामपंचायतीकडे याबाबतची कुठलीही नोंद नाही व सदर उद्योगाला कोणतेही कर अथवा घरपट्टी आकारण्यात येत नाही याची माहिती घ्यावी. तसेच कमीत कमी २५ बोगस कंपन्या आहेत की, ज्यांचे ग्राम पंचायतीकडे कोणतेही नोंद नाही.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण ३ यांनी सदर जनसुनावणी फक्त प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक प्रश्न/मुद्यांबाबतअसल्याने कृपया फक्त पर्यावरण विषयक प्रश्न विचारावे असे नमूद केले. मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांनी खालीलप्रमाणे मत व्यक्त केले.
"कुठल्याही कंपनीच्या जन सुनावणीमध्ये सामान्य जनतेने सुनावणीत व्यक्त केलेल्या मताची नोंद केली जाते, त्यानंतर त्याचे इतिवृत्त तयार करुन ते पर्यावरण अनुमती साठी पाठविले जाते असे नमूद केले. तसेच त्यावर

कृ.मा.प.

प्रकल्प धारकांकडून सकारात्मक उत्तर दिले नसेल तर त्यांना पर्यावरण अनुमती (EC) मिळत नाही असे सांगितले. त्यामुळे ही जनसुनावणी तुम्हा जनतेमध्ये काय भावना आहेत किंवा तुमचे काय मत आहे हे ऐकून जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सामान्य जनतेचे जे काही मत आहे त्याला समाधानकारक उत्तर मिळेल.''

**श्री.महेंद्र जनार्दन पाटील, उसरगाव, ता. वाडा, जि. पालघर**- उसर ग्रामपंचायतीकडून झालेले ठराव किंवा शेतकऱ्यांनी दिलेले अर्जाबाबत प्रश्न विचारले.

मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, "ही पर्यावरणविषयकजनसुनावणी असून या व्यतिरिक्त बांधकामाच्या परवानगीचा विषय असेल, नियोजनाचा विषय असेल या वेगवेगळया बाबी असून त्यासाठी वेगळया यंत्रणा आहेत. आजच्या जनसुनावणीमध्ये फक्त पर्यावरण विषयक बाबी मांडणे आवश्यक आहे.

**श्री.महेंद्र जनार्दन पाटील, उसरगाव, ता. वाडा, जि. पालघर**- मी दिलेल्या पत्रावर मा. अध्यक्ष महोदय आपल्यामार्फत कार्यवाही व्हावी ही विनंती.

मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांनी श्री.पाटील यांच्या पत्राबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तपासणी करतील व त्यानुसार उद्योगानी पर्यावरण विषयक बाबींची पूर्तता केली नसल्यास योग्य ती कारवाई केली जाईल असे सांगितले.

३) **श्री. निलेश दशरथ पाटील, नरेगाव, ता. वाडा, जि. पालघर :** मा.महोदय ही जनसुनावणी आज येथे होत असून उद्योगाबाबत प्रदूषणविषयक तक्रार करुनही कुठल्याही प्रकारचे निवारण होत नाही असे म्हटले. दूसरा मुद्दा म्हणजे उद्योगाकडून स्थानिकांना वीस, तीस, चाळीस, पन्नास टक्के रोजगार देणार आहात की, शासन नियमानुसार ८० टक्के रोजगार देणार आहे ते त्यांनी लिहून द्यायला पाहिजे.

संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी तक्रारीचे निवारण कशा प्रकारे केले जाते याबाबत विस्तृत माहिती दिली.

प्रकल्प प्रवर्तक – ३० ते ४० टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात येईल असे सांगितले. अकुशल कामगार गावातून घेतले जातील व गावात नाही मिळाले तर बाहेरुन घेतले जातील असे सांगितले. मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांनी गावात कामगार नाही मिळाल्यास आजूबाजूच्या गावातील लोकांना रोजगारासाठी प्राधान्य द्यावे असे निर्देश दिले. प्रकल्प प्रवर्तक- मा. अध्यक्ष यांचे आदेशानुसार गावात आवश्यक कामगार नाही मिळाल्यास आजुबाजूच्या गावातील लोकांना रोजगार देण्यात येईल असे सांगितले.

४) **श्री.किशोर सुरेश मसे, शेतकरी, उसर गाव ता. वाडा, जि. पालघर**- कंपनीने स्थानिकांना रोजगार दिले जातील असे त्यांनी लिहून द्यावे असे माझे वैयक्तिक मत आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी स्थानिकांसाठी ६० ते ७० टक्के रोजगार देण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले.

कृ.मा.प.

**मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर-** कुशल आणि अकुशल म्हणजे स्पष्ट करावे असे कंपनी व्यवस्थापनास विचारले तसेच १० मनुष्यबळाची गरज आहे तर सगळे स्थानिक घ्यावयास काय हरकत आहे?

**प्रकल्प प्रवर्तक** —जे मशीन आपॅरेट करतील ते कुशल कामगार आणि हेल्पर व इतर काम करणारे अकुशल कामगार असे सांगून कंपनीमार्फत सगळे स्थानिक कामगार घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे नमूद केले.

५) **श्री. महेंद्र जाधव, उसर, ता.वाडा, जि. पालघर-** ही कंपनी गावठाणाच्या बाजूला असून गावठाणामध्ये भविष्यात लोक वस्ती होण्याची शक्यता आहे. गावठाणमध्ये लोकं घर बांधून राहू शकतात, त्यामुळे भविष्यात या उद्योगापासून गावाला प्रदूषणामुळे धोका होऊ शकतो असे मत व्यक्त केले.

**संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३** यांनी सांगितले की, सदर ग्रामपंचायत पेसा क्षेत्रात येत असल्यामुळे ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय म.प्र.नि.मंडळाकडून उद्योग उभारणीसाठी परवाना देण्यात येत नाही.

**मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर-** या जनसुनावणीमध्ये केलेल्या पॉवरपॉईंट सादरीकरणाचे प्रती सर्व ग्रामस्थांना देण्यात यावेत असे कंपनी व्यवस्थापनाला निर्देश देण्यात आले. तसेच सादरीकरणामध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता कंपनीकडून झाली नाही तर ग्रामस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार करावेत असे निर्देश दिले.

प्रकल्प प्रवर्तकांनी होय असे उत्तर दिले. संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीवर मंडळाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

**निष्कर्ष** : जनसुनावणीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, ग्रामस्थ, व्यवसायिक सहभागी झाले होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा व आक्षेप व्यक्त केले. संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३ यांनी सांगितले की, मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर व जनसुनावणी समितीचे सदस्य, प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून लोकप्रतिनिधी व गावकरी यांचा पर्यावरणविषयक बाबींचा विरोध, सूचना, अपेक्षा इत्यादींबाबतची नोंद घेतली आहे. शेवटी संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांच्या मान्यतेने जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहीर केले.

( डॉ.सीमा उदय दळवी )
समितीचे संयोजक आणि
उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३

( डॉ. राजेंद्र आ. राजपूत )
समितीचे सदस्य आणि
प्रादेशिक अधिकारी, कल्याण

( गोविंद मा. बोडके )
समितीचे अध्यक्ष आणि
जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा